CNR No. MHRG040072672019

## नियमित दिवाणी दावा क्र.२३४/२०१७ मधील निशाणी क्र.२४ वरील आदेश

सदरहू अर्ज वादींनी, वादी क्र.२/१ यांच्या नावात दुरूस्ती करण्याची परवानगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१/१ ते २/९ यांनी अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल असुन प्रतिवादी क्र.३/१ ते ३/३ यांनी निशाणी क्र.२६ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केले.

२. वादींचे वि.अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, वादी क्र.२/१ यांचे नाव सुलोचना बंडू कनोजे उर्फ ठकीबाई मारूती धानिवले ऐवजी सुलोचना उर्फ ठकूबाई बंडू कनोजे उर्फ ठकीबाई मारूती धानिवले हे नमुद करणे आवश्यक असुन सदरहू दुरूस्ती करण्याची परवानगी मिळावी. प्रतिवादी क्र.१/१ ते २/९ यांचे वि.अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, अर्जास प्रतिवादींची हरकत नसुन योग्य तो आदेश करण्यात यावा. प्रतिवादी क्र.३/१ ते ३/३ यांचे वि.अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, दावा दाखल करण्यापुर्वी योग्य माहिती व कागदपत्रांची पुर्तता करून दावा तयार करून वादींची स्वाक्षरी घेण्यासाठी वादींना दाव्याची प्रत दिलेली होती व त्यावेळी नावात बदल असल्याची बाब निदर्शनास येणे अपेक्षित असुन वादींनी निशाणी क्र.२१ कडे दावा बिनशर्त मागे घेण्याकरिता पुरशीस दाखल केली असुन त्यास प्रतिवादी क्र.३/१ ते ३/३ यांनी हरकत घेतली असुन दाव्यात राहिलेल्या त्रुटी भरून काढण्याकरिता सदरहू अर्ज देण्यात आला असुन तो खर्चासह फेटाळण्यात यावा.

३. अभिलेखाचे अवलोकन करता व वादी, तसेच प्रतिवादी क्र.१/१ ते २/९ व प्रतिवादी क्र.३/१ ते ३/३ यांचे वि.अधिवक्ता यांचे प्रतिपादन विचारात घेता असे दिसुन येते की, प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.२/१ यांच्या नावात दुरूस्ती करून मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरूस्ती केल्यास दाव्याच्या स्वरूपात कुठलाही बदल होत नाही. प्रकरण गुणवत्तेवर निकाली करण्यासाठी व न्यायाच्या हिताच्या दृष्टीने सदरहू अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. परिणामी, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**: आदेश :**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींना दाव्यात प्रार्थित दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2026.01.17 17:12:56 +0530

पनवेल
दिनांक १६/०१/२०२६.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
पनवेल